**राज्यस्तर व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेच्या नावामध्ये बदल करण्याबाबत तसेच स्पर्धेच्या प्रचलित नियमावलीमध्ये सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : क्रीस्पर्धा-२०१२/(प्र.क्र.२३४/१२)/क्रीयुसे-२,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक : १८ जानेवारी,२०१३.**

वाचा :- (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-संकीर्ण-२००८/ प्र.क्र.११०/०८/क्रीयुसे-२, दिनांक १९.११.२००८,
(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-संकीर्ण-२००८/ प्र.क्र.११०/०८/क्रीयुसे-२, दिनांक १५.११.२०१०,
(३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-क्रीस्पर्धा-२०११/ प्र.क्र.४५/११/क्रीयुसे-२, दिनांक ३.१.२०१२.

प्रस्तावना:- राज्यातील व्हॉलीबॉल खेळाच्या खेळाडूंना राज्य स्पर्धेत खेळण्याची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी तसेच त्यांना व क्रीडाप्रेमी प्रेक्षकांना दर्जेदार खेळाडूंचे कौशल्य व खेळ पाहण्यास मिळावा यासाठी १९ वर्षाखालील मुले व मुलींसाठी प्रतिवर्षी राज्यस्तर व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा निर्णय उपरोक्त दिनांक १९.११.२००८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला असून, उपरोक्त दिनांक १५.११.२०१० च्या शासन निर्णयान्वये सदर स्पर्धेच्या नियमावलीस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच स्पर्धा आयोजनासंबंधातील विविध बाबींच्या वाढलेल्या खर्चामुळे सदर स्पर्धेच्या प्रतिवर्ष रु.१८.०० लाख एवढ्या अनुदानामध्ये वाढ करुन ते प्रतिवर्ष रु.५०.०० लाख एवढे करण्यास उपरोक्त दिनांक ३.१.२०१२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तत्कालिन मा.उप मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१.७.२०११ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने व्हॉलीबॉल संघटनेच्या पदाधिका-यांशी विचारविनिमय करुन उपरोक्त दिनांक १५.११.२०१० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या प्रचलित नियमावलीमध्ये काही सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती व त्याबाबत आता शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे :-

शा स न नि र्ण य : राज्यस्तर व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेचे नाव "छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा" असे करण्यास तसेच या स्पर्धेच्या उपरोक्त दिनांक

१५.११.२०१० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या प्रचलित नियमावलीमध्ये सुधारणा करुन सोबतच्या परिशिष्ठ-"अ" मधील सुधारित नियमावलीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे राज्यस्तर व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेसाठी सोबतच्या परिशिष्ट-"ब" अनुसार बाबनिहाय खर्चास तसेच परिशिष्ट-"क" अनुसार विविध समित्या गठीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. या स्पर्धेसाठी होणारा खर्च मुख्य लेखाशीर्ष "२२०४-क्रीडा व युवकसेवा-(०९)(१०) व्हॉलीबॉल चषक स्पर्धा (२२०४ ५४० १)-३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" याखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याअंतर्गत त्या त्या वर्षी मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय सन २०१२-१३ या वर्षापासून आयोजित केल्या जाणा-या स्पर्धांसाठी लागू होईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर (**www.maharashtra.gov.in**) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक-२०१३०११४१४४६४५५८२१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कि. शां. परब )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
(२) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
(३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(४) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(५) आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(६) सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा,
(७) मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव,
(८) मा.राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव,
(९) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक,
(१०) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी,
(११) निवड नस्ती (क्रीयुसे-२).

## : प रि शि ष्ट-"अ" :

## शासन निर्णय क्रमांक-क्रीस्पर्धा-२०१२/(प्र.क्र.२३४/१२)/क्रीयुसे-२, दिनांक १८ जानेवारी,२०१३चे सहपत्र

## छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तर व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा नियम,२०१२

नियम-१ :- शीर्षक :- या नियमांना छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा नियम, २०१२ असे संबोधण्यात यावे.

नियम-२ :- उद्दिष्ट :- राज्यातील व्हॉलीबॉल खेळाच्या खेळाडूंना राज्य स्पर्धेत खेळण्याची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी तसेच त्यांना व क्रीडाप्रेमी प्रेक्षकांना दर्जेदार खेळाडूंचे कौशल्य व खेळ पाहण्यास मिळावा असे या स्पर्धेचे उद्दिष्ट आहे.

नियम-३ :- स्पर्धेचे स्वरुप व निकष :- (अ) या स्पर्धा दरवर्षी राज्य स्तरावर १८ वर्षाखालील मुले / मुली व २१ वर्षाखालील मुले / मुली या वयोगटामध्ये राष्ट्रीय व्हॉलीबॉल महासंघाच्या नियमाप्रमाणे महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटना यांच्यामार्फत आयोजित करण्यात येतील,

(ब) स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूचे वय १८ वर्षाखालील व २१ वर्षाखालील वयोगटासाठी त्या त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी १८ वर्षे व २१ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक राहील,

(क) महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेचे महाराष्ट्रात क्रीडा स्पर्धेसाठी ८ विभाग आहेत. त्या प्रत्येक विभागातून १८ व २१ वर्षाखालील मुलांचा प्रत्येकी १ व मुलींचा प्रत्येकी १ असे एकूण १८ वर्षाखालील मुलांचे ८ व मुलींचे ८ तसेच २१ वर्षाखालील मुलांचे ८ व मुलींचे ८ संघ स्पर्धेत सहभागी होतील,

(ड) स्पर्धेत सहभागी होणारे संघ हे महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेने आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धेतून सहभागी होणार असल्याने संघ निवडण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेचा राहील.

नियम-४ :- स्पर्धेच्या खर्चाचा तपशील :- या स्पर्धेच्या खर्चाचा तपशील सोबत जोडलेल्या परिशिष्ट-"ब" प्रमाणे राहील.

नियम-५ :- पुरस्काराचे स्वरुप :- (अ) या स्पर्धेसाठी मुख्य चषक बनविण्यात येईल. तसेच विजयी खेळाडूंना पदके प्रदान करण्यात येतील,

(ब) स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडू व अधिका-यांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात येतील. तसेच प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक विजयी संघातील खेळाडूंना प्राविण्य प्रमाणपत्रे देण्यात येतील. सदर प्रमाणपत्रावर जिल्हाधिकारी तथा आयोजन समितीचे कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेचे सचिव (आयोजन सचिव), विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा व जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या स्वाक्ष-या असतील.

<u>नियम-६</u> :- <u>सहभागी संघांना द्यावयाचा प्रवास व इतर खर्च</u> :- सदर स्पर्धेचे आयोजन दरवर्षी राज्यस्तरावर करण्यात येणार असल्याने स्पर्धेचा कालावधी हा ७ दिवसांचा राहील. (प्रत्यक्ष स्पर्धा पाच दिवस तर स्पर्धेच्या अगोदर एक दिवस व स्पर्धेनंतर एक दिवस) तसेच निवास व भोजन व्यवस्था, वाहतूक व्यवस्था व स्पर्धेच्या आयोजनावरील खर्च आयोजन समितीमार्फत करण्यात येईल. स्पर्धेत सहभागी होणा-या संघांना दुस-या वर्गाचे रेल्वे भाडे / ज्याठिकाणी रेल्वे उपलब्ध नसेल त्याठिकाणी जाण्यायेण्याचे निमआराम बसचे भाडे देण्यात येईल. तसेच स्थानिक वाहतूक व्यवस्था आयोजन समितीमार्फत पुरविण्यात येईल.

<u>नियम-७</u> :- <u>आहरण व संवितरण अधिकारी</u> :- या स्पर्धेसाठी आयुक्त/संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

<u>नियम-८</u> :- <u>आर्थिक मंजूरीचे अधिकार</u> :- या स्पर्धेसाठी शासनाने मंजूर केलेली रक्कम आयोजन समितीकडे अनुदान स्वरुपात देण्यात येईल व आयोजन समितीच्या नावे बँकेत खाते उघडण्यात येईल. या खात्याचा व्यवहार आयोजन समितीचे कार्याध्यक्ष यांच्या मान्यतेने करण्यात यावा. स्पर्धेचे व्यवहार कार्याध्यक्ष, आयोजन सचिव व संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा तथा कोषाध्यक्ष यांच्यापैकी दोघांच्या स्वाक्षरीने करण्यात येतील.

<u>नियम-९</u> :- <u>विनियोग प्रमाणपत्र</u> :- या स्पर्धा महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटना यांच्यामार्फत आयोजित करण्यात येत असल्याने परिशिष्ट-"ब" मध्ये दर्शविलेली रक्कम रु.५०.०० लाख परिशिष्ट-"क" मधील आयोजन समितीस अनुदान म्हणून देण्यात येईल. स्पर्धेचे आयोजन पूर्ण झाल्यानंतर आयोजन समितीने दोन महिन्याच्या आत मंजूर अनुदानाचे लेखा परीक्षण करुन अनुदान विनियोग प्रमाणपत्र, स्पर्धेच्या खर्चाचा अहवाल व स्पर्धेचा सविस्तर अहवाल संचालनालयास सादर करणे आवश्यक राहील. अनुदानाची काही रक्कम शिल्लक राहिल्यास ती चलनाद्वारे शासनास परत करण्यात येईल.

<u>नियम-१०</u> :- <u>स्पर्धेसाठी संघांच्या सहभागाची जबाबदारी</u> :- या स्पर्धेमध्ये १८ व २१ वर्षाखालील मुले व मुली यांचे संघ सहभागी होण्याबाबतची संपूर्ण जबाबदारी महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघटनेची राहील.

<u>नियम-११</u> :- <u>स्पर्धेसाठी गठीत करावयाच्या समित्या</u> :- या स्पर्धेसाठीच्या विविध समित्या परिशिष्ट-"क" प्रमाणे राहतील.

<u>नियम-१२</u> :- <u>सर्वसाधारण</u> :-

(I) आयोजन समितीच्या पहिल्या बैठकीत स्पर्धेचे स्वरुप व अंदाजपत्रक मंजूर करुन घेण्यात येईल.

(II) महाराष्ट्रात ज्याठिकाणी इनडोअर स्टेडियमची सुविधा उपलब्ध आहे त्याठिकाणी स्टेडियममध्ये व इतर ठिकाणी प्रकाशझोतात हे सामने खेळविले जातील,

(III) अनुदानाव्यतिरिक्त अधिक खर्च झाल्यास तो आयोजन समितीने करावा.

(IV) या स्पर्धा ज्या जिल्ह्यात होतील त्या जिल्ह्याचे व विभागाचे संबंधित अधिकारी समितीचे सदस्य असतील.

(V) आयोजन समितीस आवश्यक वाटल्यास उपयुक्त ठरणा-या अन्य व्यक्तींची सदस्य म्हणून नियुक्ती करता येईल. तसेच उपरोक्त नमूद केलेल्या उपसमित्यांमध्ये वाढ करता येईल.

(VI) स्पर्धेसाठी नेमण्यात येणा-या तांत्रिक अधिका-यांचा प्रवास खर्च, निवास व भोजन खर्च, स्थानिक वाहतूक खर्च परिशिष्ट-"ब"मध्ये नमूद केल्यानुसार आयोजन समितीतर्फे करण्यात येईल. दैनंदिन कार्यालयीन कामासाठी आवश्यक तो कर्मचारीवर्ग आयोजन समितीस नियुक्त करता येईल.

(VII) या स्पर्धेचे आयोजन शक्यतो प्रत्येक वर्षी जानेवारी महिन्यात करण्यात यावे. तत्पूर्वी संघटनेने त्यांच्या १८ व २१ वर्षे वयोगटाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन पूर्ण करावे.

(VIII) संघटनेने आयोजित केलेल्या १८ व २१ वर्षे वयोगटाच्या क्रीडा स्पर्धेमध्ये ज्या जिल्ह्याच्या खेळाडूंनी राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत त्यांच्या विभागाकडून सहभाग घेतलेला आहे अशाच खेळाडूंना स्पर्धेत प्रवेश देण्यात यावा.

एखादा खेळाडू आजारी असल्यास, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धा व प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेला असल्यास व इतर अत्यंत महत्त्वाच्या कामामुळे त्या खेळाडूंऐवजी त्याच जिल्ह्यातील / विभागातील गुणानुक्रमे राखीव खेळाडूस प्रवेश देण्यात यावा.

(IX) खर्चाच्या बाबींमधील रु.५०.०० लाखाच्या मर्यादेत बक्षिसाच्या रकमेव्यतिरिक्त उर्वरित रक्कम आयुक्त / संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांच्या मान्यतेने इतर बाबींवर खर्च करता येईल.

(X) स्पर्धेचे आयोजन साखळी व बाद पध्दतीने करण्यात येईल.

(XI) निवास व्यवस्था व भोजन व्यवस्था, प्रेक्षक व्यवस्था, प्रसिध्दी व अन्य व्यवस्थापकीय बाबींची जबाबदारी संबंधित समित्यांची असेल.

<u>नियम-१३</u> :- <u>नियम शिथिल करणे / बदल करणे</u> :- या नियमावलीमधील कोणताही नियम शिथिल करणे त्यात अंशत: किंवा पूर्णत: बदल करणे, नवीन नियम समाविष्ट करणे याबाबतचे सर्व अधिकार शासनास राहतील.

--------

**:परिशिष्ट- 'ब' :**

**शासन निर्णय क्रमांक- क्रीस्पर्धा २०१२/(प्र.क्र.२३४/१२)/क्रीयुसे-२, दिनांक १८ जानेवारी, २०१३**

**चे सहपत्र**

**छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल चषक क्रीडा स्पर्धेच्या खर्चाचा तपशील.**

| अ.क्र. | बाब | बाबनिहाय खर्च |
|---|---|---|
| १. | सहभागी संघ १९ वर्षे मुले ८ व मुली ८ संघ, २१ वर्षे मुले ८ व मुली ८ संघ असे एकुण ३२ संघ,<br>प्रत्येक संघामध्ये १२ खेळाडू,१ क्रीडा मार्गदर्शक व १ व्यवस्थापक असा एकुण १४ जणांचा संघ राहील. (३२ X १४ = ४४८) | -- |
| २. | सरपंच, पंच, अधिकारी, संघटना पदाधिकारी व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांची संख्या अंदाजे १००. | -- |
| ३. | स्पर्धेचा कालावधी एकुण ७ दिवस, ५ दिवस स्पर्धा व एक दिवस स्पर्धेपूर्वी व एक दिवस स्पर्धेनंतर. | -- |
| ४. | प्रवास खर्च जाणे-येणे:- खेळाडू, व्यवस्थापक, मार्गदर्शक, पंच, अधिकारी, संघटना पदाधिकारी, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना अंदाजे रु. ५००/- प्रमाणे दुस-या वर्गाचे रेल्वे भाडे/ज्या ठिकाणी रेल्वे उपलब्ध नसेल त्याठिकाणी जाण्यायेण्याचे निमआराम बसचे भाडे, शासकीय अधिकारी यांना शासननियमाप्रमाणे (५०० X ५४८) | रु. २,७४,००० |
| ५. | खेळाडू,व्यवस्थापक,मार्गदर्शक, पंच, अधिकारी, संघटना पदाधिकारी, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचा भोजन खर्च दरदिवशी प्रत्येकी रू.२५०/- प्रमाणे ७ दिवस (२५० X ५४८ X ७) | रु. ९,५९,००० |
| ६. | खेळाडू,व्यवस्थापक,मार्गदर्शक पंच, अधिकारी, संघटना पदाधिकारी, शासकीय अधिकारी यांचा निवास खर्च रू.१५०/-प्रमाणे ७ दिवस(१५० X ५४८ X ७) | रु. ५,७५,४०० |
| ७. | व्हालीबॉल फिरता चषक २ मुले व २ मुली | रु. ३,००,००० |
| ८. | खेळाडू, मार्गदर्शक, व्यवस्थापक यांना पदक (मेडल) प्रति सेट रु. ९०० प्रमाणे (९०० X ५६) | रु. ५०,४०० |
| ९. | रोख बक्षिसे<br>अ. साखळी स्पर्धेतील प्रत्येक सामन्यातील विजयी संघाला रु.५०००/- प्रमाणे १८ वर्षे मुले २ गट, मुली २ गट व २१ वर्षे मुले २ गट व मुली २ गट असे एकुण ८ गट X ६ सामने -- एकुण ४८ सामने X ५००० प्रमाणे | रु. २,४०,००० |
| | ब. साखळी स्पर्धेतील प्रत्येक सामन्यातील पराभूत संघाला रु.२,५००/-प्रमाणे १८ वर्षे मुले २ गट, मुली २ गट व २१ वर्षे मुले २ गट व मुली २ गट असे एकुण ८ गट X ६ सामने -- एकुण ४८ सामने X २,५०० प्रमाणे | रु. १,२०,००० |
| | क. उपांत्य फेरीतील प्रत्येक विजयी संघाला रु.५०,०००/- प्रमाणे १८ वर्षे मुले २ सामने, मुली २ सामने व २१ वर्षे मुले २ सामने व मुली २ सामने असे एकुण ८ सामने X रु. ५०,०००/- प्रमाणे | रु. ४,००,००० |
| | ड. उपांत्य फेरीतील प्रत्येक पराभूत संघाला रु.२५,०००/- प्रमाणे १८ वर्षे मुले २ सामने, मुली २ सामने व २१ वर्षे मुले २ सामने व मुली २ सामने असे एकुण ८ सामने X रु. २५,०००/- प्रमाणे | रु. २,००,००० |

| | | |
|---|---|---|
| | इ. अंतिम विजयी संघाला रु.१,२५,०००/- प्रमाणे १८ वर्षे मुले १ सामना मुली १ सामना व २१ वर्षे मुले १ सामना व मुली १ सामना असे एकुण ४ सामने X रु.१ २५,०००/- प्रमाणे | रु. ५,००,००० |
| | फ अंतिम उपविजयी संघाला रु.७५,०००/- प्रमाणे १८ वर्षे मुले १ सामना मुली १ सामना व २१ वर्षे मुले १ सामना व मुली १ सामना असे एकुण ४ सामने X रु.७५,०००/- प्रमाणे | रु. ३,००,००० |
| | **एकुण रोख बक्षिसे** | रु.१७,६०,००० |
| १०. | सरपंच, पंच ,सामनाधिकारी, संघटना प्रतिनिधी व शासकीय अधिकारी, एकुण १०० यांना मानधन रू.५००/- प्रमाणे ७ दिवस.(१००X ५०० X ७) | रु. ३,५०,००० |
| ११. | क्रीडांगण तयार करणे व देखभाल खर्च. (माती, पाणी, रोलर, चुना, व इतर) | रु. १,००,००० |
| १२. | मैदानासाठी व स्पर्धेच्या कामासाठी स्वयंसेवक २५ यांचे मानधन रु. २५०/- प्रमाणे ७ दिवस (२५० X २५ X ७) | रु. ४३,७५० |
| १३. | प्रेक्षक गॅलरी, क्रीडांगणावरील प्रकाशझोतासाठी व्यवस्था ,विदयुत व्यवस्था, शामियाने, व्हीआयपी आसनव्यवस्था, निमत्रीतांची आसनव्यवस्था स्टेज व इतर तदनुषंगीक बाबींचा खर्च | रु. ३,५०,००० |
| १४. | <u>सादील खर्च</u>:- उदघाटन व समारोप,रोषणाई,प्रसिध्दी,बॅनर्स,साउंड सिस्टीम,व्हिडीओ रेकॉर्डींग व फोटो, छपाई, प्रमाणपत्र छपाई झेरॉक्स,आवश्यक क्रीडा साहीत्य, स्टेशनरी, संगणक/फॅक्स, टेलीफोन, वाहतूक खर्च व स्पर्धेच्या अनुषंगाने होणारा इतर खर्च इत्यादी. | रु. २,३७,४५० |
| | | रु. ५०,०००,०० |

**टीप :-** बाब क्र. ७ मधील रु. ३,००,०००/- इतकी रक्कम सन २०१३-१४ या वर्षापासून सादिल खर्चामध्ये रु.१,५०,०००/- व प्रेक्षक गॅलरी व त्या कॉलममधील बाबींसाठी रु.१,५०,०००/- याप्रमाणे वर्ग करण्यात यावी.

: प रि शि ष्ट-"क" :

शासन निर्णय क्रमांक-क्रीस्पर्धा-२०१२/(प्र.क्र.२३४/१२)/क्रीयुसे-२, दिनांक १८ जानेवारी,२०१३चे सहपत्र.

छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तर व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासंबंधात गठीत करावयाच्या विविध समित्या

छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तर व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेचे आयोजन यशस्वी होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे विविध समित्या गठीत करण्यात याव्यात :-

(अ) उच्चस्तरीय समिती (High Power Committee)

सदर स्पर्धेचे सर्वसाधारण धोरण व संनियंत्रण करणे, स्पर्धेचे ठिकाण ठरविणे आणि स्पर्धेसाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे उच्चस्तरीय समिती नेमण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| १ | मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) | अध्यक्ष |
| २ | राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) | उपाध्यक्ष |
| ३ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव (वित्त) | सदस्य |
| ५ | सचिव, महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल असोसिएशन | सदस्य |
| ६ | आयुक्त / संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे | सदस्य सचिव |

(ब) आयोजन समिती

राज्यस्तर व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेचे आयोजन यशस्वी होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे आयोजन समिती गठीत करण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्ह्याचे पालक मंत्री | अध्यक्ष |
| २ | संबंधित जिल्ह्याचे जिल्हा परिषद अध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ३ | स्थानिक आमदार | उपाध्यक्ष |
| ४ | शहराचे महापौर / नगराध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ५ | जिल्हाधिकारी | कार्याध्यक्ष |
| ६ | महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव | आयोजन सचिव |
| ७ | उपसंचालक (क्रीडा व युवकसेवा) | कोषाध्यक्ष |
| ८ | संबंधित जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी | संयुक्त सचिव |
| १० | महापालिका आयुक्तांचे / मुख्याधिकारी, नगरपालिका यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | पोलीस आयुक्तांचे / पोलीस अधीक्षकांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १२ | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १३ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| १४ | महाविद्यालयाचे प्राचार्य (दोन) | सदस्य |
| १५ | जिल्हा क्रीडा परिषदेचे सदस्य (दोन) | सदस्य |
| १६ | जिल्हा परिषद सदस्य / नगरसेवक (दोन) | सदस्य |
| १७ | आकाशवाणी / दूरदर्शन प्रतिनिधी | सदस्य |

आवश्यकतेनुसार या समितीमध्ये विशेष निमंत्रक म्हणून सभासद घेण्याचा अधिकार अध्यक्षांना व कार्याध्यक्षांना राहील.

<u>उपसमित्या</u> :-

याशिवाय स्पर्धा यशस्वीरितीने पार पाडण्यासाठी आयोजन समितीच्या अधिपत्याखाली खालील उप समित्या नेमण्यात याव्यात :-

(१) तांत्रिक समिती (क्रीडांगण व सामने)
(२) निवास व्यवस्था समिती
(३) भोजन व्यवस्था समिती
(४) प्रसिध्दी व स्मरणिका समिती
(५) वाहतूक व्यवस्था समिती
(६) स्वयंसेवक समिती
(७) उद्घाटन / समारोप समारंभ समिती
(८) वैद्यकीय सेवा समिती

आयोजन समिती उपयुक्त ठरणाऱ्या व्यक्तींची वरील उपसमित्यांमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती करेल. तसेच आयोजन समितीस आवश्यकतेनुसार वरील उपसमित्यांमध्ये वाढ करता येईल.

---------